## ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**डि्रमलॅन्ड व्यापारी संकुलासमोरील घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** - नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डि्रमलँड व्यापारी संकुलासमोरच्या रस्त्यावर भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना 29 मार्च रोजी सायंकाळी 5 वाजता घडली. विजय नथ्थुजी डेहनकर (62, रहाटगाव) असे मृताचे नाव आहे. माहितीनुसार विजय डेहनकर हे 29 मार्च रोजी सायंकाळी एमएच 27 डीजी 8174 या क्रमांकाच्या दुकाने यावली शहीद येथील शेतात गेले होते. येथून रहाटगावकडे परत येत असताना ट्रक क्रमांक एमएच 27 डीटी 0310 विजय यांच्या दुचाकीला धडक दिली. त्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती नांदगावपेठ पोलिसांना मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. या अपघातामुळे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी तत्काळ विजयचा मृतदेह जिल्हा रुग्णालयात नेला. याप्रकरणात वैभव विजयराव डेहनकर (31) याच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.


# हा कापुराचा वास उठन चौथाई, धुवा अतराई, गर्जना धुताची होतो नामावरी!

## श्री क्षेत्र सावंगा ( विठोबा ) येथे 'गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सव'








देव व भक्त समानतेचे प्रतिक 72 फुट उंच झेंड्यांना नविन खोळ चढविण्याचा भव्यदिव्य, नेत्रदीपक धार्मिक सोहळा उत्साहात पार पडला. तसेच झेंडा उतरविण्याचा सोहळा आपल्या कॅमेरात कैद केला छायाचित्रकार मनिष जगताप यांनी.

### झेंडे चढविण्याचा चित्त थरारक नेत्रदीप कार्यक्रम

*बाळासाहेब सोरगिवकर/रवि कलाने*

*चांदूर रेल्वे,( दि.30 )-महाराष्ट्रातील विदर्भात प्रसिद्ध लाखो लोकांचे श्रद्धास्थान असलेले चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा ( विठोबा ) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे रविवारी ( दि.30 ) ला गुढीपाडव्याच्या निमित्ताने दुपारी 5 वाजता गुढी पाडव्याच्या मुहुर्तावर महाराजांचे 'झेंडे चढविण्याचा' चित्त थरारक नेत्रदीप असा कार्यक्रम कापुराच्या अखंड ज्योतीने आणि भजनाच्या गजरात संस्थानचे विश्वस्त मंडळ आणि लाखों भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला. तत्पुर्वी शनिवारी ( दि.29 ) रोजी दुपारी 4 वाजता अमावस्या निमित्ताने 'चंदन- उटी-रमना' चा कार्यक्रम पार पडला.*

**लाखों भाविकांची उपस्थिती** | **शेकडो क्विंटल कापूराची विक्री**

### पहाटेपासूनच वाहनांच्या रांगा

गुढीपाडव्याला पहाटेपासूनच वाहनाच्या रांगा सावंगा विठोबा मार्गावर लागल्या होत्या. भाविक मिळेल त्या वाहनाने सावंग्यात दाखल होत होते. दूरचे असंख्य भाविक कुटूंबासह आधीच सावंग्यात दाखल झाले. पहाटेपासून मंदिरासमोर अवधूत महाराजाच्या समाधीच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांब रांगा लागल्या होत्या. कापूराचा सुगंध सर्वत्र पसरून संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.यात्रेत विविध वस्तुंची दुकाने सजली. आकाश पाळणे, विविध खेळांची दुकाने सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

संस्थानचे विश्वस्त चरणदास नामदेवराव कांडलकर रा. सावंगा (विठोबा) हे नवीन वस्त्र परिधान करून यांचे शुभ हस्ते महाराजांच्या बोहलीची विधीवत पूजन तसेच दोन्ही झेंड्याची पूजा करून पायाचा स्पर्श न लागू देता दोरांच्या सहाय्याने झेंडे चढविण्याच्या कार्यक्रम नवीन खोळ( कापड) घालण्याकरिता विश्वस्त मंडळाचे उपस्थितीत लाखों भाविकांच्या साक्षीने पार पडला. यावेळी भक्तांनी हा कापुराचा वास उठन चौथाई, धुवा अतराई, गर्जना धुताची होतो नामावरी! या पंक्तीचा गजर करुन विठ्ठलस्वरुप अवधुत महाराजांचे स्मरण केले.

बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता संस्थानचे अन्नदान समितीच्या वतीने भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच या मांडीमध्ये बाहेर गावावरून भजनासाठी येणारे अवधूत भजन मंडळाकरीता दैनंदिन भोजन,नास्ता आणि चहा इ. व्यवस्था करण्यात आली आहे .

यात्रेत शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने स्वयंशिस्त दिसून आली गर्दी च्या दृष्टीने संस्थांनाच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. आतापर्यंत झेंडे चढत असताना भाविक रांगेत ताटकळत रहायचे परंतु, संस्थानाने यावेळी दरवर्षी च्या परंपरेला फाटा देत यावेळी झेंडे ची खोळ चढवीत असतानाही दर्शन सुरु ठेवल्याने भाविकांची गैरसोय झाली नाही, कडाक्याचे





तापमान बघता संस्थान ने दर्शन मंडपाला हिरवी नेट बांधली. भाविकांनी त्यामुळे भाविकांना सावलीत दर्शन घेण्याची सोय झाली. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच भाविकांसाठी महाप्रसाद देखील आयोजित केला होता. सर्व भाविक-भक्तांनी नित्य नियमाने सुरु असलेल्या संस्थान च्या विविध कार्यक्रमाकरिता तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड वैभव मानकर, स्वप्नील चौधरी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

## ॲड.सुनिल देशमुख अध्यक्ष, तर ॲड.आशिष लांडे उपाध्यक्षपदी विजयी

### अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत 92 टक्के मतदान

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**- अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणूकीत शनिवारी सकाळी 11 ते 5 मतदान प्रक्रीया पार पडली. यामध्ये वकील संघाच्या 92 टक्के पदाधिकारी व सदस्यांनी मतदानाचा बजावला. तर दुसऱ्या दिवशी रविवारी वकील संघाच्या कार्यालयात सकाळी 9 वाजतापासून मतमोजणीला सुरूवात झाली, जी रात्री उशिरापर्यंत सुरु होती. रिंगणात असलेले प्रबळ दावेदार ॲड. सुनिल देशमुख अध्यक्ष पदाकरिता, तर उपाध्यक्ष पदाकरिता ॲड.आशिष लांडे हे विजयी झाले. रात्री 10.30 वाजता या निवडणूकीचा निकाल हाती आला. रविवारी सकाळी सुरुवातीला कार्यकारिणी सदस्य, त्यानंतर सचिव व ग्रंथालय सचिव पदाची मतमोजणी केली गेली आणि सर्वांत शेवटी उपाध्यक्ष व अध्यक्ष यांना मिळालेली मते मोजली गेली. रात्री उशिरापर्यंत मतमोजणीची प्रक्रिया चालली. अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत एकूण 11 पदासाठी मतदान झाले. वकील संघाचे 1598 सदस्य असून, त्यापैकी 1456 वकिलांनी मतदान केल्याचे सांगण्यात आले आहे. वकील संघाच्या अध्यक्षपदासाठी ॲड. सुनील देशमुख व ॲड. हरीश निंबाळकर यांच्यात लढत होती. उपाध्यक्षपदासाठी ॲड. विनोद दशशस्त्र, ॲड. आशिष लांडे, सचिवपदासाठी ॲड. अमोल मुरळ, ॲड. नासिर शाह, ॲड. सीमा तोंडरे, ग्रंथालय सचिवासाठी ॲड. विद्या मानके, ॲड. सचिन पंडितकर मैदानात होते. कार्यकारिणीच्या सात सदस्यपदांसाठी ॲड. अक्षय बोळे, ॲड. प्रेम दामोदर, ॲड. विक्रांत देशमुख, ॲड. राजू जामनेकर, ॲड. नेतल मल्ल, ॲड. गजानन मनोहरे, ॲड. चंद्रमोहन मिसल, ॲड. आशिष परिहार, ॲड.





अफरोज पठाण, ॲड. पूनम रिठे, ॲड. सुमित शर्मा, ॲड, विशाखा तागडे, ॲड. ऋषिकेश लढतीमध्ये आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. रामपाल कलंत्री व उपनिवडणूक अधिकारी ॲड. शहजाद नैयर यांनी निवडणुकीचे कामकाज पाहीले.

### सचिवपदी अमोल मुरळ विजयी

संघाच्या सचिव अमोल मुरळ, ग्रंथालय सचिव पदाकरिता विद्या माणके, तर सदस्य पदाकरिता ऋषिकेश उपाध्ये, सुमित शर्मा, अक्षय बोळे, नेतल मल्ला, आशिष परीहार, विशाखा तागडे (पाटील), पुनम रिठे विजयी झाले.

## रोशनखेडा येथील जिनिंगला भीषण आग

### लाखोंचा माल जळून खाक



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.30 )** - रोशनखेडा येथील भवानी जिनिंग ॲन्ड प्रेसिंगला 30 मार्च दुपारी 12.30 वाजताच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीमध्ये आईल मिल परिसरातील ढेप, सरकी, ऑईल मिलचा काही भाग, बारदाणा, केबल, टिना, विद्युत पंप यासह विविध साहित्य जळुन खाक झाले. या आगीमध्ये लाखोंचे साहित्य जळुन खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. वरुड आणि शेंदुरजनाघाट येथील अग्निशामक वाहनाने आग आटोक्यात आणण्यात यश मिळाले. त्यामुळे आजुबाजुला असलेला कापुस व रुईचा माल वाचला. अन्यथा मोठा अनर्थ झाला असता, ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी, असा अंदाज व्यक्त केल्या जात आहे. माहीतीनुसार, रोषनखेडा येथे खंडेलवाल परिवाराचा भवानी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कापसाची खरेदी करुन त्याच्या गाठी तयार करण्याचे काम चालते. या गाठी भारतातील विविध ठिकाणी पाठविल्या जाते. याच परिसरात आईल मिल असून 30 मार्च रोजी दुपारच्या सुमारास आईल मिलला आग लागल्याचे कर्मचार्यांचे निदर्शनास आले. त्यांनी याबाबतची माहिती मालक शरद खंडेलवाल, सौरभ खंडेलवाल व नरेंद्र खंडेलवाल यांना दिली. त्यानंतर त्यांच्या माहितीवरून वरुड आणि शेंदुरजनाघाट नगरपरिषदेच्या अग्निशामकची वाहने आणि पोलिस यंत्रणा घटनास्थळी पोहोचली. तत्पुर्वी भवानी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग परिसरामध्ये असलेल्या आग विझविण्याच्या साहित्याने आग विझविण्याचा प्रयत्न सुरु झाला. काही वेळातच वरुड आणि शें.घाट येथे 4 अग्निशामक वाहने घटनास्थळी दाखल झाली. मोठ्या शर्थीने अग्निशामक यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली. खरी परंतु या आगीमध्ये मोठ्या प्रमाणात आईल मिल परिसरातील ढेप, सरकी, ऑईल मिलचा काही भाग, बारदाणा, केबल, टिना, विद्युत पंप यासह विविध साहित्य जळुन खाक झाले. या आगीमध्ये लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाल्याचा अंदाज आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अमरावती विमानतळावर उतरले 72 आसनी विमान

## चाचणी यशस्वी झाल्यानं लवकरच होणार उद्घाटन





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 30 )-** अमरावती विमानतळावर गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पहिल्यांदाच 72 आसनी विमान दुपारी 3 वाजून 56 मिनिटांनी उतरलं. एमएडीसी अर्थात महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीनं घेतलेल्या चाचणीत इंदौर येथून उड्डाण केलेलं विशेष विमान अमरावती विमानतळावर उतरलं.

21 मिनिटांचा मुक्काम- प्रादेशिक संपर्क योजना उड्डाण अंतर्गत व्यावसायिक विमान सेवेसाठी अमरावती विमानतळ सज्ज झालं आहे. हे तपासण्यासाठी विमानतळावर विशेष चाचणी घेण्यात आली, असं विमानतळ विकास कंपनीच्यावतीनं स्पष्ट करण्यात आलं. इंदौरवरून आलेलं हे विमान 17 मिनिटांपर्यंत अमरावती विमानतळावर मुक्कामी होतं. दुपारी 4 वाजून 17 मिनिटांनी या विमानानं ? पुन्हा इंदौरच्या दिशेनं झेप घेतली.

लवकरच होणार उद्घाटन- अमरावती विमानतळ आता पूर्णत: सज्ज झालं आहे. अमरावती विमानतळ हे विदर्भाची अर्थव्यवस्था, व्यापार, पर्यटन आणि हवाई संपर्कासाठी अतिशय महत्वाचं ठरणार आहे. अमरावती विमानतळाचं उद्घाटन आता लवकरच होईल, असं महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीनं स्पष्ट केलयं.

अमरावती विमानतळावर लवकरच विमान घेणार उड्डाण- महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वात अमरावती विमानतळ हे मैलाचा दगड ठरणार आहे. पहिल्या यशस्वी विमान सेवेसह अमरावतीनं हवाई नकाशावर स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली. अमरावती विमानतळाचं उद्घाटन आता लवकरच होईल, असं महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्ष आणि व्यवसायिक संचालक स्वाती पांडे यांनी सांगितलं.



# प्रवाशांना मिळणार थंडगार पाणी

## कापुसतळणी बसस्थानकावर गाडगेबाबा पाणपोईचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी ( दि. 30 )** – कापुसतळणी येथील बसस्थानकावर पक्षीमित्र अरुण शेवाणे यांच्यावतीने निष्काम कर्मयोगी गाडगेबाबा पाणपोई सुरू करण्यात आली. यामुळे प्रवाशांना आता थंडगार पाणी मिळणार आहे. कापुसतळणी येथे पंचक्रोशीतील मोलमजुरी करणारे लोकं साहित्य खरेदी करण्यासाठी येतात. त्यामुळे बसस्थानकावर मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असते. उन्हाळ्याच्या दिवसात जीव लाहीलाही व्हायला लागतो. पशुपक्ष्यांसह मनुष्य सुद्धा थंड पाण्याच्या शोधात असतात. श्रीमंत लोक पाण्याची बाटली विकत घेऊन तहान भागवू शकतात. परंतु मोलमजुरी करणाऱ्या गरीब लोकांना पाण्याची बाटली विकत घेणे शक्य नाही. अशा वर्दळीच्या ठिकाणी पाणपोई लावणे आवश्यक आहे. म्हणून पक्षीमित्र अरुण शेवाणे यांच्या लोकोपयोगी समाजसेवेतून गुढीपाडवा या हिंदू नववर्षाचे औचित्य साधून निष्काम कर्मयोगी गाडगेबाबा पाणपोई उभारण्यात आली. आमदार गजानन लवटे यांचे शुभ हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून अंजनगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विकास येवले, उपजिल्हाप्रमुख शिवसेना ( उबाठा ) महेंद्र दिपटे उपस्थित होते. प्रशांत सरदार, चेतन बाबनेकर, मंगेश रोकडे, प्रदीप सातवटे, सुरेश महानकर, नाहिद अहेमद, वसंत बानाईत, रवींद्र ढेपे, अजय शिराळकर, पक्षीमित्र अरुण शेवाणे व पंचक्रोशीतील नागरिक यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

# पेन्शनबाबत विकल्प भरण्यास एक वर्षाची मुदतवाढ

**राज्यातील 17 लाख कर्मचाऱ्यांना दिलासा**

**जुनी पेन्शन संघटनेच्या पाठपुराव्याला यश**



राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांची मागणी ही जुन्या पेन्शनची आहे; परंतु सरकारने तिन्ही योजना मधून एक योजना निवडण्याबाबत 31 मार्चपर्यंत कर्मचाऱ्यांना मुदत दिलेली होती. त्यामुळे जोपर्यंत सुधारित पेन्शन योजना बाबत स्पष्टता व मार्गदर्शक सूचना सरकार तर्फे दिल्या जात नाहीत तोपर्यंत कर्मचाऱ्यांच्या संकल्पना स्पष्ट होणार नाही. त्यामुळे विकल्प भरून देण्याबाबत मुदत वाढ देण्यात यावी याकरिता राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळ सतत पाठपुरावा करत होते. शासनाने योजना पेन्शन योजना निवडीबाबत एक वर्ष मुदत वाढ दिल्याने सुमारे राज्यातील 17 लाख कर्मचाऱ्यांना दिलासा मिळालेला आहे.

**योगेश पखाले,**
**राज्य प्रमुख,**
**नप व मनपा विभाग, जुनी पेन्शन संघटना**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.30 ) –** जुनी पेन्शन हक्क संघटनेने वारंवार मंत्रालयात वित्त विभागाशी संपर्क साधून कर्मचाऱ्यांना विकल्प निवडण्याबाबतची मुदत वाढ द्यावी याकरिता पाठपुरावा केला. त्याचीच फलश्रुती म्हणून राज्य सरकारने योजना पेन्शन योजना निवडण्याबाबत विकल्प देण्याकरिता मुदतवाढ देऊन 31 मार्च 2026 पर्यंत कर्मचाऱ्यांना विकल्प देण्याबाबत मुदत वाढ दिलेली आहे.

राज्यातील 2005 नंतर झालेल्या राज्य सरकारी व सर्व विभागातील कर्मचाऱ्यांना शासनाने जुनी पेन्शन ऐवजी अंशदायी निवृत्ती वेतन योजना डीसीपीएस लागू केलेली होती. त्यानंतर केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणेच नॅशनल पेन्शन स्कीम म्हणजेच एनपीएस ही योजना राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांकरिता लागू करण्यात आली होती. परंतु सदर योजना या शेअर मार्केटवर आधारित असल्यामुळे सेवानिवृत्ती वेळी नेमकी किती रक्कम मिळेल याबाबत साशंकता असल्याने कर्मचाऱ्यांच्या सतत जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीच्या हट्टामुळे राज्य सरकारने गॅरंटेड पेन्शन स्कीम सुरू केली.

तसेच केंद्र शासनाने सुद्धा युनिफाईड पेन्शन स्कीम म्हणजेच यूपीएस ही नवीन योजना कर्मचाऱ्यांकरिता आणलेली होती. परंतु जीपीएस व यूपीएस दोन्ही योजना बाबत मार्गदर्शक सूचना, अंमलबजावणी बाबतचे स्पष्ट निर्देश नसल्याने तसेच या सर्व योजना पैकी एक कोणतीही योजना निवडण्याचा विकल्प देण्याबाबत शासनाने 31 मार्च 2024 ही डेडलाईन ठरवण्यात आली होती.

त्यामुळे कोणतेही मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे व आपले भविष्य सुखरूप असावे या उद्देशाने संभ्रमात असलेले लाखो कर्मचारी कोणता विकल्प निवडावा याबाबत संभ्रमात होते. त्यामुळे जुनी पेन्शन हक्क संघटनेने वारंवार मंत्रालयात वित्त विभागाशी संपर्क साधून कर्मचाऱ्यांना विकल्प निवडण्याबाबतची मुदत वाढ द्यावी. याकरिता पाठपुरावा केला. त्याचीच फलश्रुती म्हणून राज्य सरकारने योजना पेन्शन योजना निवडण्याबाबत विकल्प देण्याकरिता मुदतवाढ देऊन 31 मार्च 2026 पर्यंत कर्मचाऱ्यांना विकल्प देण्याबाबत मुदत वाढ दिलेली आहे. त्यामुळे राज्यातील 17 लाख कर्मचाऱ्यांना दिलासा मिळालेला आहे.

# दहेंद्री येथील प्रथम, तर बामादेही, काजलडोह येथील शेतकरी गटाला व्दितीय पुरस्कार

## पानी फाउंडेशन चा सत्यमेव जयते फॉर्मर कप स्पर्धा 2024 चा बक्षीस वितरण सोहळा



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.30 ) –** पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल बालेवाडी येथे रविवारी तिसऱ्या पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा 2024 पुरस्काराचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. ज्यामध्ये चिखलदरा तालुक्यातून दहेंद्री येथील श्री चक्रधर शेतकरी गटाला प्रथम क्रमांकाचा, तर बामादेही

अभिनंदन महिला शेतकरी गट व काजलडोह येथील संस्कृती महिला शेतकरी गटाला व्दितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, पाणी फाउंडेशन चे संस्थापक अभिनेते आमिर खान, किरण राव , मुख्य कार्यकारी अधिकारी,सत्यजित भटकळ हिवरे बाजारचे पद्मश्री पोपटराव पवार, सह्याद्री ॲग्रो चे विलास शिंदे, शांतीलाल जी मुथा, डॉ.अविनाश पोळ, सह अनेक सिने कलाकार दिग्गज मंडळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन अभिनेते जितेंद्र जोशी व अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी केले.

दिवसेंदिवस शेतीचा आकार लहान झाल्याने 75 टक्के शेतकरी अल्पभूधारक झाले आहेत त्यामुळे शेती महत्त्वाची आहे त्यामुळे तंटे कमी होऊन यांत्रिक शेती शक्य होईल शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन होईल म्हणून गट शेतीसाठी राज्यात लवकरच नवे धोरण आणले जाईल. तसेच पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून आमिर खान व त्यांचे सहकाऱ्यांनी पाण्यासाठी मोठी चळवळ उभी केली आहे आम्ही 2515 पासून जलयुक्त शिवार योजनेद्वारे ज्यांना आंदोलन उभे केले मात्र 2019 मध्ये ज्याला ब्रेक आला आता आपण यावर पुन्हा काम सुरू केले आहे मागील त्याला सौर पंपाचे धोरण अवलंबून सर्व फिडर सौर ऊर्जेवर कार्यान्वित करून डिसेंबर 2026 पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा 12 तास 20 देण्याचे उद्दिष्ट आहे नैसर्गिक शेतीसाठी पहिल्या टप्प्यात 25 लाख हेक्टर ची उद्दिष्ट ठेवले आहे विषमुक्त शेतीसाठी पाणी फाउंडेशनच्या मदतीने काम केले जाईल या कामासाठी एक लाख कर्मचाऱ्यांची फौज काम करेल ती पाच वर्षात बदललेल्या महाराष्ट्र दिसेल.अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. चिखलदरा तालुक्यातील तिनही गटाचे तालुकावासियांकडून कौतुक केले जात आहे.

# सेवानिवृत्त दिलीप देशमुख यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 30 ) –** जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयच्या आस्थापनावरील व जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालयात कार्यरत आरोग्य सहाय्यक दिलीप देशमुख हे 31 मार्च रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमीत्याने 30 मार्च रोजी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. बनसोड यांनी दिलीप देशमुख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य हिवताप निर्मूलन कर्मचारी मध्यवर्ती संघटना व जिल्हा शाखा, तसेच पतसंस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य हिवताप व हत्तीरोग कर्मचारी मध्यवर्ती संघटना राज्य शाखेचे सरचिटणीस व अमरावतीचे जिल्हाध्यक्ष डी.एस.पवार, सुरेशचंद्र माणिकपूरे, प्रदीप गिरी, एच पी. भोंगारे, पी.ओ. लुंगे, एस.व्ही. जयस्वाल, व्ही.व्ही.पांडे, एस.डी.चोपकर, जे.बी.माहोरे, आर.आर. काटोलकर, डी.डी.गौरखेडे, एन. एस. पाचघरे, एम.एच.कोरडे, एस. व्ही. सोळंके, एस.आर.दिवान, एन.एम. गायगोले, डी.आर .कापडे, डी.जी.ढेवले, एस .डब्ल्यू. नांदणे, ए. एस. इंगळे, डी.एम.गुहे, एस.बी.गौरखेडे, बाळासाहेब तराळ, सचिन गायकवाड, प्रकाश दातीर, बी. आर. होरे, एस.एस.लांडे, आर. जी. खोलापुरे व मंजुषा देशपांडे, शिल्पा शिर्के, संघटनेचे व संस्थेचे सर्व पदाधिकारी, डोंगरे, गोसावी मित्रपरिवार आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# गाडगे बाबांच्या मौलिक विचारातून आपले जीवन समृद्ध करावे - माजी मंत्री वसुधा देशमुख

## चांदुबजारच्या कै.नारायणराव अमृतराव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय पदवी वितरण समारंभ



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 30 )** चांदुरबाजार येथील कै.नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालयात 26 मार्च रोजी पदवी वितरण समारंभ संस्थेच्या अध्यक्ष वसुधा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सदर पदवी वितरण समारंभास प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयीन विकास परिषदेचे सदस्य स्वप्निल देशमुख, राजवीर देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. व्ही. डी. चोरे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी उन्हाळी 2024 मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पदवी वितरण समारंभामध्ये एम. ए. भूगोल, बी.ए., व बी.सी.ए विभागातील विद्यार्थ्यांना पदवींचे वितरण करण्यात आले. यामध्ये एम. ए. भूगोल ची विद्यार्थिनी प्रज्ञा काकडे ही विद्यापीठामधून चौथी मेरीट आलेली आहे. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतामध्ये माजी राज्यमंत्री वसुधा देशमुख यांनी पदविकांशींना मार्गदर्शन करीत असताना, पुढील आयुष्यात तुमच्यावर कौटुंबिक जबाबदारी येणार असून त्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. सोबतच गाडगेबाबांच्या जीवनातील विविध प्रसंगांची आठवण करून दिली. स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून आपण केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थी हा समाजाचा एक घटक आहे म्हणूनच आता आणखी जबाबदारीने काम करून, यश संपादित करून आपली बांधिलकी जपली पाहिजे असे प्रतिपादन केले. समारंभाचे प्रमुख अतिथी स्वप्निल देशमुख यांनी आपल्या मनोगतामध्ये आपले जीवनानुभव मांडले.

विद्यार्थ्यांनी एक निश्चित ध्येय ठरवून मार्गक्रमण केल्यास यश प्राप्ती होते. सातत्य हेच आपल्या यशाचे गमक असल्याचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. समारंभाच्या प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. व्ही.डी. चोरे यांनी पदवी वितरण समारंभास उपस्थित पाहुण्यांचा परिचय करून देत महाविद्यालयाचा शैक्षणिक प्रगतीचा आलेख हा सातत्याने उंचावत असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठामध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करीत असेच यश सदैव संपादित करावे अशी आशा व्यक्त केली. आपल्या महाविद्यातील पदवी प्राप्त विद्यार्थी समाजातील प्रत्येक क्षेत्रात उत्तम काम करतात. त्यामुळे त्यांच्या सोबतच महाविद्यालयाचे सुद्धा नाव उंचावत असल्याचे समाधान व्यक्त केले. महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. वाय. पडोळे यांनी सर्व पदविकांशींना पदवी वितरणासाठी माननीय अध्यक्ष यांच्याकडून अनुज्ञती प्राप्त करून त्यांना पदवी अधिग्रहणासाठी पाचारण केले. समारंभाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली याप्रसंगी सूत्रसंचालन प्रा. विपुल चुके तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. अमोल वारे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# दिव्यांग कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल

## मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी | महावितरण दिव्यांग कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन वितरण सोहळा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 30 )** जिल्ह्यातील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना विशेष सुविधायुक्त दुचाकी वाहन भेट देऊन महावितरणने दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन प्रवासातील मोठा अडथळा दुर केला आहे. त्यामुळे या दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन मिळेल आणि त्यांच्याकडून कंपनीची आणि ग्राहकांची अधिक उत्तम सेवा घडेल असे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी केले.



विद्युत भवन येथे 30 मार्च रोजी दिव्यांग अधिकारी व कर्मचारी दुचाकी वाहन वितरण सोहळा पार पडला. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते आणि सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख,कार्यकारी अभियंते प्रदीप पुनसे,राजेश माहुलकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने,वरीष्ठ व्यवस्थापक विजय पचारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी महावितरण कंपनीच्या नियमानुसार दिव्यांगाना मिळणारी साधने तसेच वाहने मिळवून देण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करणारे प्रमोद वैद्य, प्रफुल भुयार, सचिन म्हात्रे, पुरूषोत्तम दिक्षितग उपकार्यकारी अभियंता प्रशांत काळे आणि व्यवस्थापक कल्पना भुले यांचे कौतूक केले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या निर्णयाच्या अधिन राहून दुचाकी वाहनाची मागणी करणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील महावितरणच्या आठ दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना विशेष सुविधायुक्त दुचाकी वाहनाचे आज मुख्य अभियंता यांच्याहस्ते वितरण करण्यात आले. यावेळी बोलतांना अधीक्षक अभियंता दीपक देवहाते म्हणाले की, दिव्यांग कर्मचाऱ्यांना उपरोक्त परिपत्रकानुसार वाहन मिळवून देण्याची प्रक्रिया क्लिष्ट होती, तरीही वाहनांची खरेदी व थेट कर्मचाऱ्यांच्या नावे नोंदणी प्रक्रिया रीतसर पार पाडून गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कर्मचाऱ्यांना वितरण होणे हा एक दुग्धशर्करा योग आहे.

### राज्यात एकाच वेळी दुचाकी वितरण कार्यक्रम

राज्यात एकाच वेळी आठ कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन वितरणाचा योग केवळ अमरावती जिल्ह्याने साधला असल्याचे सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख यांनी सांगीतले. यावेळी दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांच्यावतीने मनोगत व्यक्त करतांना अतीरिक्त कार्यकारी अभियंता विलास शिंदे यांनी आनंद व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले. यावेळी विकास बांबल यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन व्यवस्थापक (मानव संसाधन) कल्पना भुले यांनी केले. या कार्यक्रमाला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध रेती तस्करांच्या आवळल्या मुसक्या

## अचलपुर उप-विभागात तीन ठिकाणी धाडसत्र ■ 98 लाख 90 हजाराचा माल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** - सहायक पोलीस अधिक्षक डॉ. शुभम कुमार यांनी 29 मार्च रोजी अचलपूर उपविभागातील अवैध रेती वाहतुकीवर कार्यवाही करून, रेती तस्करांच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांच्या तीन वेग-वेगळे पथकाने अचलपुर उप-विभागात नाकाबंदी करून तीन ठिकाणी धाडी टाकून अवैध रेती तस्करी करणार्यांजवळील लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अचलपुर हद्दीत आरोपी सैय्यद आसीफ सैय्यद मुसा (45), शेख इरशाद शेख ईकबाल (25, दोन्ही रा. डेपो जवळ, वरूड) हे अशोक लिलॅन्ड कंपनीचे टिप्पर क्रमांक एम.एच. 40 /सी.एम. 3498 मध्ये अवैधरित्या विनापरवाना 48 टन रेती (वाळु) ची वाहतुक करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून 2 लाख 90 हजार रुपये किमंतीची रेती व टिप्पर असा एकुण 32 लाख 90 हजार रुपये किमंतीचा माल जप्त केला आहे. दुसरी कारवाई परतवाडा हद्दीत करण्यात आली. परतवाडा हद्दीत आरोपी इमरान खान रहमत खान (31, रा. शेंदुरजना घाट) हा टाटा कंपनीचे टिप्पर क्रमांक एम.एच.27 डी.टी. 1013 मध्ये अवैधरित्या विनापरवाना 8 ब्रास रेतीची वाहतुक करताना पकडण्यात आला. त्याच्या ताब्यातून 1 लाख 50 हजार रुपये किमंतीची रेती व टिप्पर असा एकुण 31 लाख 50 हजाराचा माल जप्त करण्यात आला आहे. तिसर्या कारवाईत सरमसपुरा हद्दीत आरोपी राजेश प्रल्हादराव धुळे (39, रा. हनवतखेडा, ता. अचलपुर), नितेश वासुदेव चौधरी (33, रा.पाडा, ता. मोर्शी) हे टाटा कंपनीच्या टिप्पर क्रमांक एम.एच.27 बी.एक्स. 4344 मध्ये अवैधरित्या विनापरवाना 72 टन रेतीची वाहतुक करताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून 4 लाख 50 हजार रुपये किमंतीची रेती व टिप्पर असा एकुण 34 लाख 50 हजाराचा माल जप्त केला आहे. या सर्व आरोपींविरुध्द अचलपुर, परतवाडा, सरमसपुरा येथे भारतीय न्याय संहिता कलम 303 (2), 3 (5) अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. आरोपींच्या ताब्यातून 3 चारचाकी वाहन व वाळु असा एकुण 98 लाख 90 हजाराचा माल जप्त करण्यात आला आहे.

# उन्हाच्या दाहकतेमुळे सर्व शाळा सकाळच्या सत्रात

### शिक्षण संचालकांचे आदेश

### विदर्भात सुर्य ओकतोय आग



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 30 )** - राज्यात आणि प्रामुख्याने विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये उन्हाळा चांगलाच तापू लागला आहे. सुरुवातीच्या मार्च महिन्यातच सुर्य अक्षरश: आग ओकत आहे. त्याचा विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता लक्षात घेता विदर्भातील सर्व जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यातील शाळा दुपारऐवजी सकाळच्या सत्रात भरविण्याचे आदेश राज्याच्या शिक्षण संचालकांनी दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनाही उन्हापासून बचाव होणार असल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत तापमान 41 अंशापर्यंत पोहोचले आहे. सर्वत्र प्रचंड उकाडा जाणवत आहे. सध्या उष्णतेच्या लाटेमुळे आरोग्याविषयी गंभीर समस्या निर्माण होण्याची संभावना आहे. ती लक्षात घेऊन जिल्हा स्तरावरुन उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी संबंधीत प्रशसकीय विभाग, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनाबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्या पार्श्‍वभूमिवर राज्यातील शाळेच्या वेळेत बदल करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली होती. उन्हाच्या कडाक्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी विविध संघटनांकडून शाळेची वेळ सकाळची करण्याबाबत शिक्षण विभागाला निवेदने दिली होती. तसेच काही जिल्हयांनी सकाळ सत्रात शाळा भरविणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

तथापि या सर्व जिल्हयांमध्ये शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे निदर्शनास येत होते. राज्यातील सर्व शाळांमध्ये वेळापत्रक, शाळेची वेळ यामध्ये एकसूत्रता असणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेउन राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळेची वेळ सकाळच्या सत्रात करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी दिले आहे. प्राथमिक शाळांसाठी सकाळी 9 ते 11.15 व माध्यमिक शाळांसाठी सकाळी 7 ते 11.45 अशी वेळ करण्यात यावी, तसेच स्थानिक परिस्थितीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने या कालावधीमध्ये बदल करता येईल, असे या आदेशात म्हटले आहे.

विदर्भ व अमरावती जिल्हात उन्हाचा पारा वाढत असल्याने अमरावती शिक्षणाधिकारी यांनी सकाळ पाळीतील शाळेची वेळ 7.15 ते 12.15 अशी केली होती. याला शिक्षक समितीने विरोध करत 17 मार्चला निवेदन देऊन शाळेची वेळ सकाळी 7 ते 11 करावी अशी मागणी केली होती. जिल्हा प्रशासनाने शिक्षण संचालकांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक पातळीवर शाळेच्या वेळेत बदल करावा. जिल्हा परिषद मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करुन निर्णय घ्यावा, अशी मागणी शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजय पवार, जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे, राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी केली आहे.

# व्हरटेक्स कोचिंग क्लासेसचा आयआयटी मुंबई ला अभ्यास दौरा




### गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगांव रेल्वे ,( दि.30 )** - विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तंत्रज्ञानाची जाण आणि औद्योगिक तसेच सामाजिक ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी व्हरटेक्स कोचिंग क्लासेस (अमरावती आणि धामणगाव) सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. याच पार्श्‍वभूमीवर यंदा इयत्ता 11वी-12वी, छ्वश्चश्व आणि रू।ञ्ज-ष्टश्वञ्ज मधील 15 गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयआयटी बॉम्बे येथे चार दिवसीय मोफत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दौऱ्याने विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळाली असून त्यांच्या ज्ञानात लक्षणीय भर पडली आहे.

या चार दिवसीय दौऱ्यात विद्यार्थ्यांना आयआयटी बॉम्बेच्या प्राध्यापक, तज्ञ आणि तिथल्या विद्यार्थ्यांशी सखोल संवाद साधण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांनी नवीन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स, नवीकरणीय ऊर्जा यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती घेतली. तसेच, आयआयटीतील प्रयोगशाळा आणि संशोधन केंद्रांना भेटी देऊन त्यांनी आपल्या अभ्यासाचे प्रत्यक्ष उपयोग पाहिले. या अनुभवाने विद्यार्थ्यांचे दृष्टिकोन व्यापक झाले असून त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळाली आहे. हा अभ्यास दौरा व्हरटेक्स कोचिंग क्लासेसच्या संचालिका नूतन शाहाकार (ठाकरे) आणि उपसंचालक प्रा.हर्षद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या दौऱ्यात रिद्धी लोखंडे, सिद्धी लोखंडे, संचिता शेंडे, रुपल मेटे, मैथिली मिरचापुरे, खुशबू यादव, ईश्वरी इंगळे, गायत्री देशमुख, साम्यक गजभिये, सुजल चव्हाण, आदित्य शेटे, अथर्व सात्रोटे, अनुप निखर, श्रेयश मेटे, शिवम शिरभाते या यामध्ये समावेश होता. अमरावती आणि धामणगाव येथे आपली शाखा असलेली व्हरटेक्स कोचिंग क्लासेस ही संस्था विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी ओळखली जाते. छ्वश्चश्व, हृश्वश्वञ्ज आणि रू।ञ्ज-ष्टश्वञ्ज सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण देण्यासोबतच अशा अभ्यास दौऱ्यांसारख्या उपक्रमाचे आयोजन करते हे विशेष.



# ऑलिम्पियाडमध्ये शांतिनिकेतनच्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.30 )** - ऑलिम्पियाड परिक्षेचा निकाल नूकताच जाहिर झाला आहे. यापरिक्षेत मोर्शीच्या शांतिनिकेतन इंग्लिश शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. शाळेतील आठ विद्यार्थ्यांनी या परिक्षेत सुवर्णपदकावर आपली मोहोर उमटविली. वर्ग दुसरीची विद्यार्थिनी विशुद्धी फंदे, वर्ग तिसरीमधून ईशानी जुवारे, संस्कृती पांडव, पार्थ नवले, कैवल्य जाणे, वर्ग चौथीमधून अबोली गडलिंग, वर्ग पाचवीची मनस्वी अंधारे या विद्यार्थ्यांनी मॅथ ऑलिम्पियाडमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करुन सुवर्णपदक पटकाविले. तर वर्ग आठवीची माही सुने आणि स्वानंद रोशन खेडे या विद्यार्थ्यांनी इंग्रजी ऑलिम्पियाड मध्ये सुवर्ण पदक प्राप्त करून दुसर्याध फेरीत प्रवेश मिळविला आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश प्राप्त करून आपल्या शाळेचा, आई-वडिलांचा, शिक्षकांचा मान उंचावला आहे. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे शिक्षिका व मुख्याध्यापकांना दिले आहे. शाळेचे मुख्याध्यापक अमोल चौधरी, उपमुख्याध्यापिका प्रीती राऊतकर, वर्गशिक्षिका बहुरूपी, गोफणे, गिरी, भगत व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# जैविक शेतीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन

## देहरादून येथे कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि. 30 )**- धामणगाव रेल्वे तालुक्यातील शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य आणि पत्रकार यांची निवड नवधान्य संस्था (देहरादून, दिल्ली) यांच्या जैविक शेती कार्यशाळेसाठी करण्यात आली. देहरादून येथे आयोजित या कार्यशाळेत संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातून अनेक शेतकरी आणि शेती तज्ज्ञ सहभागी झाले होते.

कार्यशाळेत जैविक व विषमुक्त शेती, पारंपरिक शेती पद्धती, मातीचे आरोग्य, बियाण्यांचे महत्व, जलव्यवस्थापन आणि पारंपरिक आहार यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. नवधान्य संस्थेच्या प्रमुख अध्यक्ष डॉ. मीरा शिवा यांनी जैविक शेतीच्या संकल्पनेवर सविस्तर भाष्य करत शेतकऱ्यांना पारंपरिक आणि स्थानिक बियाण्यांच्या पुनर्वापराचे महत्त्व सांगितले.रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीचे पोत कमी होत असून आरोग्यावरही दुष्परिणाम होत आहेत. जैविक शेतीमुळे आरोग्यदायी अन्न उत्पादन होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढू शकते. कार्यशाळेत सहभागी शेतकऱ्यांना नैसर्गिक कीड नियंत्रण, गांडूळ खत, जीवामृत, दशपर्णी अर्क यासारख्या जैविक उपाययोजनांची माहिती देण्यात आली.



### महिला गटांचा सहभाग

गावोगावी शेतकरी गट आणि महिला गट तयार करून जैविक शेतीचा प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन करण्यात आले. विशेषत: महिलांनी पारंपरिक व विषमुक्त अन्नपदार्थांचा अवलंब करावा आणि लोकप्रबोधन करावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेला महाराष्ट्र नवधान्य संस्थेचे प्रमुख पवन मिश्रा, प्रशांत डगवार, संजय बानगुडे, पुरुषोत्तम बोरगावकर, गणेश तगवार, उल्हास चव्हाण, सलीम पठाण, सरिता चव्हाण, निशा चव्हाण, मनोज शिवणकर, प्रवीण पडोळे, पत्रकार उमेश भुजाडणे, सोनाली भोकरे, सुरेंद्र चव्हाण, मारुती राऊत यांसह अनेक मान्यवर आणि शेतकरी उपस्थित होते. जैविक शेती ही पुढच्या पिढीसाठी फायदेशीर आहे. रासायनिक घटकांचा वापर कमी करून पर्यावरण व आरोग्य संरक्षित करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन पवन मिश्रा यांनी केले.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक जैविक शेती पद्धतींबाबत सखोल माहिती मिळाली असून भविष्यात आपल्या शेतात जैविक शेतीचा अवलंब करण्यासाठी अनेकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# जनप्रतिनिधींची जनता दरबारच्या आयोजनाकडे पाठ

## खासदार, आमदारांची उदासिनता ■ समस्या मांडाव्या कोठे? जनतेचा सवाल

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर( दि.30 )** - जबाबदार जनप्रतिनिधींकडून वेळोवेळी भरविला जाणारा जनता दरबार हा त्या-त्या भागातील नागरिकांसाठी आपल्या समस्या व प्रश्न माडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ समजला जातो. मात्र अचलपूरमध्ये माजी आमदार बच्चू कडू यांच्यानंतर विद्यमान जनप्रतिनिधींनी जनता दरबाराच्या आयोजनाकडे पाठ फिरविली आहे. खासदार बळवंत वानखडे आणि आमदार प्रविण तायडे जनता दरबारासाठी पूर्णत: उदासिन दिसत आहेत. त्यामुळे आम्ही आमचे प्रश्न, समस्या कोठे मांडाव्या, असा सवाल नागरिकांकडून विचारण्यात येत आहे.





### निकाली निघतील समस्या

नगर परिषद, तहसील कार्यालय, महसूल विभाग, कृषी कार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दर 15 दिवसांनी जनता दरबार आयोजित केल्यास नागरिकांच्या समस्या जलदगतीने सोडवता येऊ शकतात. मात्र, अद्याप कोणत्याही स्तरावर अशी कोणतीही पुढाकार घेतलेली नाही. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना दर 15 दिवसांनी जनता दरबार घेण्याची मागणी केली आहे. त्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी निश्चित होईल आणि नागरिकांचे प्रश्न वेळेत सुटतील.

प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे जनता दरबारासारख्या महत्त्वाच्या उपक्रमाकडे अचलपूर मतदारसंघात दुर्लक्ष होत आहे. जनता दरबार हा एक असा मंच आहे जिथे नागरिक थेट प्रशासन आणि लोकप्रतिनिधींसमोर आपले प्रश्न मांडू शकतात आणि त्यांच्या समस्यांचे त्वरित समाधान होऊ शकते. मात्र, अचलपूरमध्ये जनता दरबार आयोजित होण्याची कोणतीही चिन्ह दिसत नाहीत.

माजी आमदार बच्चू कडू यांनी आपल्या कार्यकाळात 'राहुटी उपक्रमा'च्या स्वरूपात जनता दरबार सुरू केला होता. ग्रामीण भागात याचा चांगला परिणाम जाणवला होता. अनेक समस्या तत्काळ मार्गी लागल्याने जनतेतून त्याप्रती समाधान व्यक्त करण्यात आले होते. उप-विभागीय कार्यालय, तहसील, महसूल विभाग, कृषी विभाग यासह विविध सरकारी कार्यालये एकाच ठिकाणी नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी उपस्थित राहायची. अचलपूर मतदारसंघात हा उपक्रम तब्बल 20 वर्षे यशस्वीरित्या राबवला गेला.

सध्याच्या परिस्थितीत अचलपूरमधील नागरिकांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. पाण्याच्या बिलांमध्ये वाढ, बेकायदेशीर अतिक्रमण, खराब रस्ते, वीज-पाणीपुरवठा समस्या, नगर परिषद आणि महसूल विभागाशी संबंधित तक्रारी, तसेच डीबीटी अंतर्गत अनुदान मिळवण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना तासनतास तहसील कार्यालयात थांबावे लागते. या सर्व समस्यांचे निराकरण जनता दरबाराच्या माध्यमातून सहज शक्य असताना अद्याप कोणीही पुढाकार घेतला नाही. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी, खासदार बलवंत वानखडे आणि आमदार प्रविण तायडे यांनी या संदर्भात कोणतीही ठोस कृती केली नाही, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आह

# पांदन रस्त्यांसाठी सरपंचाचे पालकमंत्र्यांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.30 )** - अनेक वर्षांपासून मागणी करुनही सासन रामपूर ग्राम पंचायत अंतर्गत येणार्या शिवारातील पांदन रस्त्यांची निर्मिती होत नसल्याने येथील सरपंच प्रा. विनोद सोनोने यांनी यासंदर्भात थेट जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाच साकडे घातले आहे. परिसरातील पांदन रस्त्यांचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी विनोद सोनोने यांनी पालकमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे केली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नूकतेच अमरावती येथे दौर्यातवर आले होते. त्यावेळी सोनोने यांनी त्यांची भेट घेवून निवेदन सादर केले. मागील चार-पाच वर्षापासून सासन रामपूर येथील शेतकरी पांदण रस्ते होण्याची प्रतिक्षा करित आहेत. शेतातून मालाची ने-आण करणे तसेच येण्या-जाण्यासाठी रस्त्याअभावी शेतकर्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पांदन रस्त्याची काम पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी वारंवार करण्यात आल्यानंतरही संबंधित विभागाकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. मे महिन्यापर्यंत गावातील पांदण रस्ते व्हावेत यासाठी पंचायत समिती स्तरांपासून तर मुंबई मंत्रालयापर्यंत धाव घेऊन सरपंच सोनोने यांनी या कामाला प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन घेतली. परंतू अद्यापही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नसल्याने शेतकर्यांमध्ये नाराजी आहे. तेव्हा येथील पांदन रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना निर्देश द्यावे, अशी मागणी सोनोने यांनी या निवेदनातून केली. या बरोबर दर्यापूर ते सासन रामापुर मार्गे किनखेड पूर्णा पर्यंत रस्त्याचे काम करण्यात यावे, अशी मागणीही या निवेदनातून करण्यात आली.

# श्रीराम मंदिर संस्थान मध्ये श्रीराम नवमी उत्सवाला प्रारंभ

## गुढीपाडवा ते हनुमान जयंती दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचल

### 6 एप्रिल रोजी महाप्रसाद

**महासागर प्रतिनिधी**

**टाकरखेडा संभू, ( दि. 30 )** - श्रीराम मंदिर संस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीराम नवमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, रविवारी (दि. 30) रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या महोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. 6 एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवांत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. 6 एप्रिल रोजी महाप्रसाद व श्रीराम नवमी जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात गुढीपाडवाला सकाळी 5 वाजता श्रीराम अभिषेक, पुजन व काकडा आरतीने करण्यात आली. त्यानंतर सकाळी 7 वाजता तीर्थ स्थापना व गुढीपूजन करण्यात आले. सकाळी 8 वाजता नविन पताका ध्वजारोहण, दुपारी 12 वाजता श्रीरामचरीतमानस नव्हाण्न पारायणला प्रारंभ झाला. सायंकाळी 7 वाजता आरती, भजन पार पडले. या महोत्सवांतर्गत दैनंदिन कार्यक्रमांमध्ये रोज सकाळी पाच वाजता श्रीराम अभिषेक पूजन व काकड आरती होणार आहे. त्यानंतर सकाळी सात वाजता श्रीरामचरितमानस पारायण, सायंकाळी सात वाजता आरती होईल. याशिवाय 31 मार्च रोजी रात्री आठ वाजता शेतकरी मेळाव्यामध्ये कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले हे शेतकऱ्यांना कृषी विभाग भातकुली तालुका यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन करणार आहे.



### सुंदरकांड, रोग निदान शिबिर

1 एप्रिल रोजी संध्याकाळी आठ वाजता सुंदरकांड पारायण, बुधवारी सकाळी 11 वाजता रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 3 एप्रिलला योग शिबीर, शुक्रवारी 4 एप्रिल रोजी रात्री आठ वाजता भजन संध्या, 5 एप्रिल रोजी रात्री आठ वाजता अवधूत भजन, 6 एप्रिल ला दुपारी 10 वाजता श्रीराम जन्मोत्सव व काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर 12 वाजता श्री राम जन्मानंतर महाप्रसादचे आयोजन करण्यात आले आहे. हनुमान जयंतीनिमित्य 12 एप्रिल रोजी श्री राम आणि श्री हनुमान अभिषेक, पूजा आणि काकडा आरती सकाळी 6 वाजता श्री. हनुमान जन्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

